# महाराष्ट्राच्या राजकारणावर जातीचा प्रभाव एक अभ्यास

संशोधक विद्यार्थी
**अविनाश गंगाधर मुसळे**
एम.ए., बी.एड., (राज्यशास्त्र)
पीपल्स कॉलेज, नांदेड

**प्रस्तावना**

जात हाभारतातील राजकीय किंवा प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक आहे. जातीव्यवस्थेतील विषमतेमुळे सत्तावाटपदेखील विषमपद्धतीने होत आहे. उच्च जातींनी आपल्या जातीय स्थानाच्या आधारे सत्तेचा जास्तीत जास्त वाटज्ञ मिळविण्याचे प्रयत्न केले तर कनिष्ठ जातींना स्वातंत्र्यानंतरच्या काळातही सत्तेपासून दुर फेकले गेले आहे. तरीही निवडणूका आणि लोकशाही पद्धतीचे राजकारण यांचा जातीवर परिणाम झालाच. जात हे राजकीय संघटनांचे एक साधन बनले. याविषयी रजनी कोठारीने जातीचे राजकीयीकरण झाल्याचा निष्कर्ष काढला आहे. तर एन.एन.श्रीनिवास या समाजशास्त्रज्ञांने वर्चस्वशाली ही संकल्पना मांडून जात आणि राजकारण यांतील परस्पर संबंधाची चर्चा केली. त्यांच्या मते, "स्थानिक पातळीवरील बहूसंख्य असलेली आणि वरचा दर्जा असलेली जात शिक्षण, आधुनिक व्यवसाय यात प्रगती साधते आणि स्थानिक राजकारणात वरचष्मा गाजवू लागते." रजनी कोठारीने वर्चस्वशाली जातीचा उल्लेख प्रस्थापित जात असा केला आहे. याविषयती ते म्हणतात की, "प्रस्थापित जात संख्येने मोठी असण्याची गरज नसते, कारण त्या जातीच्या राजकीय वर्चस्वाचे मुळ तिच्या वरिष्ठ दजा्रत आणि त्यातून येणाऱ्या आर्थिक बळामध्ये असते." सुसान रूडॉल्फ आणि हेबर रूडॉल्फ यांनी जात आणि राजकारण यांचे परस्पर संबंध हे परंपरा आणि आधुनिकता यातील संबंध असल्याचे म्हटले आहे. यावरून लोकशाही राजकारणात जातींना आधुनिक स्वरूपाच्या दबाव गटाचे स्वरूप प्राप्त होत असल्याचे दिसून येते.

भारतीय संविधान म्हणजे एक आदर्श मूल्यांचा ठेवा आहे. परंतु केवळ संविधान चांगले असून चालणार नाही तर संविधानाची अंमलबजावणी करणारे राज्यकर्ते चांगले, प्रभावी आणि कार्यक्षम असणे आवश्यक आहे. संविधानाच्या माध्यमातून भारतात आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्याची शक्ती संविधानात आहे. परंतु बदलत्या कालओघात सकारात्मकतेपेक्षा नकारात्मकतेचाच अधिक प्रभाव वाढत चालला आहे. याला भारतातील राजकीय पक्ष जबाबदार आहेत. आज भारतीय सामाजिक व्यवस्थेत असंख्य समस्यांने उग्र रूप धारण केले आहे. यामध्ये लोकसंख्या वाढ, गरिबी, दारिद्र्य, आर्थिक विषमता, बेकारी, रोगराई, आरोग्य, दहशतवाद, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शिक्षणाचे खाजगीकरण इत्यादी प्रश्न निर्माण झालेत. परंतु आज जात, धर्म, वर्ग, भाषा, प्रादेशिक वाद-वादविवाद, आरक्षण इत्यादी मुद्दे जाकारणाचे प्रमुख आधार बनल्यामुळे समाजाच्या जीवन आवश्यक प्रश्नाकडे शासनाचे दुर्लक्ष होत चालले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये जात, धर्म, भाषा, संस्कृती, सहकार तत्त्व, शेती आंदोलने, भूमीपूत्राचे आंदोलने, आरक्षण इत्यादी घटकांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर कशा पद्धतीने प्रभाव पडत आहे यांचा अभ्यास केला आहे.

**जात**

भारतीय राजकीय प्रक्रिया समजून घेण्यासाठी 'जात' ही संकल्पना केंद्रस्थानी मानले जाते. जात यासंदर्भात एम.एन.श्रीनिवास, आर.के.खत्री, रूडॉल्फ, एम.एस.राव इत्यादीने लिखान केले आहे. या विषयी रजनी कोठारी म्हणतात की, ''जी जात नाही ती जात'' अशी व्याख्या त्यांनी केली आहे. भारतीय राजकारणावर दुरगामी परिणाम

करणाऱ्या अनेक घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून जातीकडे पाहिले जाते.

**जातीची संकल्पना**

'Caste' या पोर्तुगीज शब्दापासून जात या शब्दाची उत्पती झाली आहे. त्यांचा अर्थ जन्म किंवा वंश असा होतो. तर 'जात' हा मराठी शब्द 'जन' या संस्कृत शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ 'जन्म' असा होतो. जात म्हणजे असा समुह ज्यांचे सदस्यत्तव हे जन्मावर आधारलेले असते.

**महाराष्ट्रातील जातीय राजकारण**

महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीय राजकारणाचा आधार हा स्वातंत्र्योत्तर काळातील नसून स्वातंत्र्यापूर्वीच्या काळातदेखील महाराष्ट्रावर विशिष्ट जातीने वर्चस्व राहिलेले दिसून येते. म्हणजेच ब्रिटिशांनी प्रबळ जातीना हाताशी धरूनच राजकीय सत्तेचा विस्तार केला होता. परंतु ते येथून गेल्यानंतर राजकीय सत्तेत पोकळी निर्माण झाली. ही जागा घेण्यासाठी महाराष्ट्रातील उच्च जाती सरसावल्या यामध्ये ब्राह्मण, मराठा व तत्सम जाती होत्या. यातूनच महाराष्ट्रात जातीवादाच्या राजकारणाला सुरूवात झालेली दिसून येते. जातीय राजकारणाच्या संदर्भात सुहास पळशीकर म्हणतात की, जातीचे भौगोलिक स्थान, पारंपारिक जातीव्यवस्थेतील दर्जा, आधुनिक काळातील राजकीय संघटन, जागृतीची पार्श्वभूमी, साधनसामग्री आणि उपजिविकेचे साधन यावर जातीचे राजकारणातील स्थान ठरते. एकंदरीत महाराष्ट्रात कनिष्ट समजल्या जाणाऱ्या जातीना पूर्वीपासूनच सामाजिक दर्जा, आर्थिक पाठबळ आणि राजकीय जागृती इत्यादी आधार नसल्याने त्या सत्ता स्पर्धेच्या बाहेर पडल्या आहेत. ज्या जातींचा सामाजिक दर्जा उच्च आहे, आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे आणि राजकीय जाणीव जागृती आहे अशा जातींचा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव राहिला आहे. यांचा अभ्यास पुढीलप्रमाणे केला आहे.

**मराठा व कुनबी मराठा**

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची पहिली विधानसभा १९६२ रोजी झाली तेव्हा पासून आजतागायत महाराष्ट्रावर मराठा जातीचे वर्चस्व राहिले आहे. मराठा लोकसंख्येचा विचार केला असता यासंदर्भात एकमत असल्याचे दिसून येत नाही. कारण वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. यामध्ये इरावती कर्वे यांनी मराठा ४० टक्के असल्याचे नमूद करतात तर सुहास पळशीकरच्या मते, १९३१ च्या जातीनिहाय जगणगनेमध्ये मराठा समाजाचे प्रमाण ३१ टक्के होते. राणे समिती किंवा मागासवर्गीय आयोगाने मराठा समाज ३१ टक्के असल्याचे नमूद केले आहे. म्हणजेच आज महाराष्ट्रात मराठा समाजाचे लोकसंख्येशी प्रमाण ३१ टक्केच मान्य केले आहे. एकंदरीत मराठा समाजाचा राजकीय सहभागा विषयी पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे.

**महाराष्ट्राच्या विधानसभेत मराठा व कुणबी मराठा जातीचे आमदार यांची संख्या दर्शविणारा तक्ता**

| निवडणूक वर्ष | मराठा | कुणबी | मराठा व कुणबी | सर्वसाधारण जागा | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|
| **१९६२** | १०६ | ३१ | १३७ | २१७ | २६४ |
| **१९६७** | १०० | २५ | १२५ | २३७ | २६९ |
| **१९७२** | १०५ | २५ | १३० | २४० | २७१ |
| **१९७८** | १०४ | २२ | १२६ | २४८ | २८८ |
| **१९८०** | १०६ | २० | १२६ | २४८ | २८८ |
| **१९८५** | १०९ | २४ | १३३ | २४८ | २८८ |
| **१९९०** | ११६ | २४ | १४० | २४८ | २८८ |
| **१९९५** | ११५ | २३ | १३८ | २४८ | २८८ |
| **१९९९** | १०४ | ३२ | १३६ | २४८ | २८८ |
| **२००४** | १११ | २४ | १३५ | २४८ | २८८ |
| **२००९** | १०९ | २३ | १३२ | २४८ | २८८ |
| **२०१४** | १०८ | २९ | १३७ | २४८ | २८८ |

वरील तक्त्यावरून विधानसभा १९६२ ते २०१४ पर्यंत म्हणजेच १२ विधानसभा निवडणुकीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, १९६२ च्या विधानसभेत मराठा आमदारांचे शेकडा प्रमाण ५२ टक्के एवढे होते. तर १९६७ मध्ये ४६ टक्के, १९७२ मध्ये ४८ टक्के, १९७८ मध्ये ४४ टक्के, १९८० मध्ये ४४ टक्के, १९८५ मध्ये ४६ टक्के, १९९० मध्ये ४९ टक्के, १९९५ मध्ये ४८ टक्के, १९९९ मध्ये ४७ टक्के, २००४ मध्ये ४७ टक्के, २००९ मध्ये ४६ आणि २०१४ मध्ये ४८ टक्के मराठा आमदार विधानसभा निवडणुकीमध्ये निवडणून गेले होते. सरासरी प्रमाण पाहता ४७ टक्के एवढे मराठा आमदार विधानसभेवर निवडून गेले आहेत.

महाराष्ट्रातील १९६२ च्या मंत्रिमंडळाची माहिती दिली आहे. यावरून असे दिसून येते की, मंत्रिमंडळात एकूण १७ मंत्र्याचा समावेश आहे. जाती निहाय प्रमाण पाहिले असता. सर्वात जास्त मंत्री मराठा समाजाचे असून त्यांचे शेकडा प्रमाण ६३ टक्के एवढे आहे. त्याखालोखाल ओबीसी १३ टक्के, तर मुस्लिम, ब्राह्मण, पारशी आणि दलित यांचे प्रत्येकी शेकडा ६ टक्के एवढे प्रमाण आहे. यावरून विधानसभेतील आमदारा बरोबर मंत्रिमंडळात देखील मराठा जातीचे वर्चस्व सुरूवातीपासूनच असलेले दिसून येते.

**महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात जातीनुसार वर्गीकरण १९६२ ते २००९**

| जात | मुख्यमंत्री | कॅ.मंत्री | रा.मंत्री | उपमंत्री | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| उच्च जाती | ६.४ | ५.० | २.६ | ४.१ | ३.९ |
| मराठा कुणबी | ५५ | ४८.६ | ५० | ५२ | ४९.४ |
| म.जाती | २.४ | १.३ | १.९ | ०.३ | १.२ |
| ओबीसी | २८.४ | १३.८ | १३.९ | ४.१ | १३.२ |
| अ.जाती | ३.९ | ८.३ | ६.२ | ८.३ | ७.४ |
| अ.जमाती | - | ६.३ | ५.६ | ८.३ | ६.१९ |
| अ.मराठी | - | ८.१० | १०.९ | १२.५ | ९.८ |
| मुस्लिम | ३.५ | ५.८ | ७ | ८.३ | ६.७ |
| ख्रिश्चन | - | - | ०.६ | - | ०.२ |
| म.ना. | - | १.९ | १.३ | २.१ | २.१ |

वरील तक्त्यावरून महाराष्ट्राच्या १९६२ ते २००९ पर्यंतच्या विधानसभेतील मंत्रिमंडळाचा आढावा घेतला आहे. यावरून एक बाब स्पष्ट होते की, मुख्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री इत्यादी पदावर मराठा जातीचे वर्चस्व आहे. मुख्यमंत्री पदाचा विचार करता मराठा ५५ टक्के, ओबीसी २८.४ टक्के, उच्च जाती ६.४ टक्के, अनुसूचीत जाती ३.९ टक्के, मुस्लिम ३.९ टक्के, आणि मध्यम जाती २.४ टक्के असे प्रमाण राहिले आहे. यामध्ये अनुसूचित जमाती, अ. मराठी, ख्रिश्चन आणि म.ना. जातीना मुख्यमंत्री पद मिळालेले नाही. कॅबिनेट मंत्रीपदाचा विचार करता मराठा ४८.६ टक्के, ओबीसी १३.८ टक्के, उच्च जाती ५ टक्के, अनुसूचीत जाती ८.३ टक्के, मुस्लिम ५.८ टक्के, आणि मध्यम जाती १.३ टक्के, अनुसूचित जमाती ६.३, अ.मराठी ५.१० आणि म.ना.१.९ असे प्रमाण राहिले आहे. एकंदरीत १९६२ ते २००९ पर्यंतच्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळावर मराठा जातीचा पगडा असलेला दिसून येतो.

**ओबीसी**

ओबीसी म्हणजे काय ? किंवा त्यांची निश्चित व्याख्या केलेली दिसून येत नाही. कारण मंडल आयोगाने महाराष्ट्रातील २७२ जातीचाच समावेश ओबीसी जातीमध्ये केला होता. पण शासनाने ४६ जातीना नव्याने ओबीसीचा दर्जा दिल्यामुळे ओबीसी जातीची संख्या ३४६ पोहचली आहे. त्यामुळे आज ओबीसीची लोकसंख्या ६० टक्क्यांवर पोहोचली आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता ओबीसी वर्ग महाराष्ट्रासह देशात सर्वात मोठा वर्ग आहे. परंतु राजकीय जाणीवाचा अभाव, विस्कळीत संघटन आणि उत्पनाच्या साधनाचा अभाव यामुळे ओबीसीना राजकीय सहभागात पुरसे प्रतिनिधित्व मिळत नाही. ओबीसी मध्ये प्रामुख्याने दोन गट पडतात यामध्ये शेतकरी आणि कारागिरांचा वर्ग. शेतकरी वर्गामध्ये (बंजारा, वंजारी, धनगर, माळी) तर कारागिर वर्गामध्ये (सुतार, शिंपी, सोनार) यांचा समावेश होतो. शेतकरी वर्गातील बंजारा, वंजारी, माळी आणि धनगर राजकीय दृष्ट्या जागृत असल्यामुळे त्यांना राजकीय सहभागाची काही प्रमाणात संधी मिळाली पण त्या तुलनेत सुतार, शिंपी आणि सोनार हे राजकीय दृष्ट्या फार वंचित राहिले आहेत. बंजारा समाजातून वसंतराव नाईक, सुधाकर नाईक, वंजारी समाजातून गोपीनाथ मुंडे, बबन ढाकणे, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, माळी समाजातून छगन भुजबळ, ना.स.फरांदे, धनगर समाजातून शिवाजीराव शेंडगे, अण्णा डांगे, महादेव जानकर यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. गोपीनाथ मुंडेनी ओबीसीना न्याय मिळवून देण्यासाठी जातिनिहाय जणगणना करावी यासाठी त्यांनी विधानसभा आणि लोकसभेत आवाज उठविला. तसेच छगन भुजबळ यांनी देखील महाराष्ट्रात ओबीसीचे संघटन बांधण्याचा प्रयत्न केला. ओबीसीचे संघटन झाले तर भविष्यात राजकारणाची दिशा बदलू शकते म्हणून महाराष्ट्रातील राजकीय पक्षाने ओबीसीच्या प्रभावी नेत्यांची शक्ती शीन करण्याचाच प्रयत्न केलेला दिसून येतो.

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

**१९६२ ते २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभेतील पक्षनिहाय ओबीसी समाजाचे आमदार दर्शवणारा तक्ता**

| निवडणूक वर्ष | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | शिव सेना | जन संघ भाजप | शे.क ा.प. | जनता पक्ष | कम्यु. | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६२ | १७ | - | - | - | - | ०४ | - | - | ०१ | २२ |
| १९६७ | २१ | - | ०१ | ०१ | ०४ | - | ०३ | - | - | ३० |
| १९७२ | २७ | - | - | ०१ | ०२ | ०१ | ०१ | - | ०१ | ३३ |
| १९७८ | २२ | - | - | - | ०५ | १२ | ०२ | - | ०६ | ४७ |
| १९८० | २९ | - | - | ०१ | ०४ | ०१ | - | - | ०२ | ३७ |
| १९८५ | ३४ | - | - | ०२ | ०४ | ०५ | - | - | ०१ | ४६ |
| १९९० | १८ | - | ११ | ०८ | ०४ | ०४ | ०२ | - | ०४ | ५१ |
| १९९५ | १३ | - | ११ | ०९ | ०३ | ०१ | ०२ | - | ०५ | ४४ |
| १९९९ | २१ | ०६ | ०६ | ०३ | ०२ | ०१ | - | - | ०३ | ४२ |
| २००४ | ०९ | ११ | ११ | ११ | ०२ | - | ०१ | - | - | ४८ |
| २००९ | १७ | ०८ | ०८ | ०६ | ०४ | ०१ | - | ०१ | ०१ | ४६ |
| २०१४ | १९ | ०९ | १० | ०७ | ०२ | - | - | - | ०४ | ५१ |

वरील तक्त्या वरून असे स्पष्ट होते की, एकंदरीत सर्वच पक्षाने ओबीसी नेतृत्वाला राजकीय सहभागाची संधी दिली आहे. परंतु हा सहभाग लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य नाही. कारण ओबीसी समाजाची लोकसंख्या ६० टक्के आहे पण त्यांचे आमदारांचे प्रमाण पाहता १४.६३ टक्के एवढे आहे. कॅबिनेटमंत्री ११ टक्के तर मुख्यमंत्री पद २८.४ टक्के ओबीसी समाजाला मिळाले आहे. ओबीसीची लोकसंख्या ६० टक्के असल्यामुळे त्यांना विधानसभेत प्रतिनिधित्व, मंत्रीपदे आणि मुख्यमंत्री पद यावर त्यांचा ६० टक्के वाटा आहे. परंतु त्यांच्यातील राजकीय जागृतीचा अभाव, सामाजिक दर्जाची उणीव, उत्तपन्नाच्या साधनाचा अभाव, संघटन कौशल्याची कमतरता इत्यादी समस्यांमुळे त्यांना राजकीय समान सहभागाची संधी मिळताना दिसून येत नाही. ओबीसीत आज ३४६ जाती असल्या तरी वंजारी, बंजारा, माळी, धनगर, वाणी, तेली इत्यादी जातीचा अपवाद वगळता बाकीच्या जाती राजकारणापासून अलीप्त असलेल्या दिसून येतात.

**सहकार क्षेत्र आणि राजकारण**

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचा पाया विठ्ठलराव विखे पाटील, रत्नाप्पा कुभांर आणि धनंजय रामचंद्र गाडगीळ यांनी घातला गेला. महाराष्ट्रातील गृहनिर्माण संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या, डेअरी, मल्टिस्टेट सहकारी बँका व हातमाग, यंत्रमाग, पणन अशा दोन लाख ३८ हजार सहकारी संस्था आहेत. महाराष्ट्रात २०० पेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने आहेत. त्यापैकी ५०३ नागरी सहकारी बँका, १६ हजार नागरी पतसंस्था व ७२७६ नोकरदारांच्या संस्था आहेत. राज्यात ३१ हजार सहकारी डेअऱ्या असून १०६ सहकारी दूध संघ आहेत. सहकार क्षेत्र हे महाराष्ट्राच्या राजकारणाची मिनी बँक म्हणून ओळखली जाते. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना जोडता येते. महाराष्ट्रामध्ये सहकार क्षेत्रावर ज्यांचे वर्चस्व आहे. तीच जात, पक्ष किंवा व्यक्ति राजकारणात मजबूत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात एकूण १७४ कारखाने आहेत त्यापैकी १५० कारखाण्यावर मराठा जातीचे वर्चस्व आहे. तसेच ३३ जिल्हा परिषदे पैकी २४ वर मराठा जातीचे वर्चस्व आहे. तसेच जिल्हा बँका ३७ पैकी ३०, नगर परिषद २२७ पैकी १३४, शिक्षण संस्था ५४ टक्के, सहकारी संस्था ७१ टक्के आणि एकूण जमिनीपैकी ७५ ते ८० टक्के जमिनी मराठा समाजाच्या ताब्यात आहेत. यावरून महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रावर मराठा समाजाचे एकहाती वर्चस्व असल्याचे सिद्ध होते.

एकंदरीत वरील माहितीवरून असे दिसून येते की, महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाची लोकसंख्या ३१ टक्के गृहीत धरली तर त्यांचा राजकीय सत्तेतील वाटा हा ३१ टक्के असायला पाहिजे होता. परंतु याठिकाणी १९६२ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपासून ते आजतागायत मराठा समाजाच्या राजकीय सहभागाचा सत्तेतील वाटा ४५ ते ५५ टक्क्यांच्या आसपास राहिलेला दिसून येतो. त्यामुळे मराठा समाजाचे महाराष्ट्राच्या राजकारणातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिका, विधानसभा, विधान परिषद तसेच लोकसभा, महाराष्ट्र मंत्रिमंडळ आणि केंद्रीय मंत्रिमंडळात वर्चस्व सातत्याने राहिले आहे. मुख्यमंत्री पदाचा विचार करता

आतापर्यंत महाराष्ट्रात २५ मुख्यमंत्र्यापैकी मराठा जातीचे १५ वेळेस मुख्यमंत्री झाले आहेत. यावरून मराठा जातीचे महाराष्ट्राच्या राजकारणावर किती मजबूत पकड आहे ते लक्षात येते. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर जातीचा फार मोठा परिणाम होतो यावरून सिद्ध होत आहे.

**संदर्भग्रंथ**

१. M.N.Srinivas, The dominat caste and other essays, University Press, New Delhi,
२. Kothari Rajani, Caste in Indian Politics orient logman, New Delhi, १९७०
३. सी.एम.कुलकर्णी, भारतीय समाजव्यवस्था, प्रकाशन, औरंगाबाद, १९८७
४. इरावती कर्वे, हिंदू समाज रचना, नागपूर विश्वविद्यालय नागपूर, प्रथम आवृत्ती, १९६४
५. सी.एम.कुलकर्णी, भारतीय समाजव्यवस्था, प्रकाशन, औरंगाबाद, १९८७
६. Late Jayant Plurulism & class Rule: Political Development in Maharashtra,
७. जैन पुखराज, बी.एल.फडिया, भारतीय शासन एवं राजनिती, साहित्य भवन पब्लिकेशन आगरा-
८. www.wikipedia.in